महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

संचालनालय, लेखा व कोषागारे, मुंबई.

कस्तुरी इमारत, तळ मजला, जे. टाटा मार्ग, पेट्रोलियम हाऊस समोर

चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०

दुरध्वनी क्र. ०२२-२२८८०१०६ E-Mail : aaoadmin-dat@mah.gov.in


संदर्भ :-

१. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३/ दि.०२.०३.२०१९.
२. संचालनालयाचे आदेश क्र.संलेको/०७-२०२२/प्रशा राप/सअ/न.क्र.१२९(२०२२) सुआप्रयो /३९६ दि. ०७.०७.२०२२.
३. संचालनालयाचे आदेश क्र.सलेको/१०-२०२२/प्रशा राप/सअ/न.क्र.१२९(२०२२)सुआप्रयो/६१८ दि.१३.१०.२०२२
४. शासन आदेश क्र.संलेको-२०२३/प्र.क्र.३२०/कोषा.प्रशा.२ दि.१५.०३.२०२४.
५. शासन वित्त विभाग आदेश क्र.संलेको-२०२४/प्र.क्र.९८/कोषा.प्रशा.२ दि. १८-०७-२०२४.

क्र.संलेको/१०-२०२५/प्रशा-राप-सलेअ/ नस्ती क्र.१२९(२०२५) /सु.से.आ.प्र.यो/रद्द आदेश/६०५ दिनांक:- 18 NOV 2025

# -: आदेश :-

**विषय** :- सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत मंजूर लाभ रद्द करणेबाबत.

शासन वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ४ वरील दि.१५.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-ब (राप) सहाय्यक लेखा अधिकारी संवर्गातील १९९ अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट- ब (राप) लेखाधिकारी संवर्गात पदोन्नती देण्यात आली होती. शासन वित्त विभागाच्या संदर्भ क्र. ५ वरील आदेशान्वये, दि. १५-०३-२०२४ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेली पदोन्नती नाकारलेल्या/पदोन्नतीच्या पदावर रूजु न झालेल्या २३ सहायक लेखा अधिकाऱ्यांची लेखा अधिकारी पदावरील पदोन्नती रद्द करण्यात आली.

उपरोक्त २३ अधिकाऱ्यांपैकी खालील अधिकाऱ्यांना सुधारीत आश्वासित प्रगती योजने अंतर्गत लेखा अधिकारी पदाचा लाभ मंजूर करण्यात आलेला आहे. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.वेतन-१११९ /प्र.क्र.३ /२०१९ /सेवा-३ / दि.०२.०३.२०१९ मधील मुद्दा क्र.३ मधील तरतुदीनुसार सदर सहायक लेखा अधिकाऱ्यांचा आश्वासित प्रगती योजने अंतर्गत देण्यात आलेला पहिला/दुसरा लाभ काढून घेण्यात येत आहे.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | म.वि.ले.से. गट - ब (राप) सलेअ नियुक्ती दिनांक | पदोन्नती रद्द आदेश दिनांक | आश्वासित प्रगती योजना अंतर्गत मंजूर लाभ आदेशाचा दिनांक | आश्वासित प्रगती योजना अंतर्गत मंजूर लाभ |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री. दिपक मधुकर धनगर | २३-०९-२०११ | १८-०७-२०२४ | ०७-०७-२०२२ | पहिला लाभ |
| २ | श्री. दादाराव गणपत रगडे | २१-०९-२०११ | १८-०७-२०२४ | १३-१०-२०२२ | पहिला लाभ |
| ३ | श्री. वसंत नारायण बिरार | ०१-१०-२०११ | १८-०७-२०२४ | १३-१०-२०२२ | दुसरा लाभ |

**उपरोक्त नमूद सहायक लेखा अधिकाऱ्यांच्या कार्यालय प्रमुखांनी, संबधित सहायक लेखा अधिकाऱ्यांनी लेखा अधिकारी पदावरील पदोन्नती नाकारल्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घ्यावी. सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार देण्यात आलेला लेखा अधिकारी पदाचा लाभ काढून घेतल्याने, संबंधिताची वेतननिश्चिती ही जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन ) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात यावी. तसेच पदोन्नतीचे आदेश रद्द झालेल्या दिनांकापासून संबंधित अधिकाऱ्यांना आश्वासित प्रगति योजने अंतर्गत देण्यात आलेल्या लाभाची वसुली करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करावा.**

सदरचे आदेश संचालनालयाच्या www.mahakosh.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असल्यामुळे सदर आदेशाच्या अनुषंगाने उपरोक्त अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी संबधित कार्यालयप्रमुख यांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरावी.

**(दीपा देशपांडे)**
संचालक,लेखा व कोषागारे,
महाराष्ट्र राज्य,मुंबई.

प्रत माहिती व पुढील कार्यवाही साठी अग्रेषित :-

१. सहसचिव (कोषा प्रशा ३), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर
३. अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी (प्राथमिक), छत्रपती संभाजी नगर.
४. महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई.
५. संबधित जिल्हा कोषागार कार्यालय.
६. संबधित सहाय्यक लेखा अधिकारी.